# मुंबईत मेट्रो-३ चे कंत्राट दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला



मुंबई : मुंबईतील पहिल्या पूर्णतः भूमिगत असलेल्या मेट्रो मार्ग-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) च्या संचलन आणि देखभालीचे कंत्राट मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला (डीएमआरसी) दिले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेत दिल्ली मेट्रोने सर्वात कमी बोली लावून हे कंत्राट मिळवले. दिल्ली मेट्रोने दोन दशकांहून अधिक काळ दिल्ली मेट्रो यशस्वीपणे चालवली आहे. मुंबईच्या पहिल्या भूमिगत मेट्रो मार्गाचे संचलन आणि देखभाल करण्यासाठीच्या या कराराचा कालावधी दहा वर्षे आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी दिली.